नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ४० Issue - 40 | वार गुरुवार दि. २६ जून २०२५ Blow- Thursday Date 26 June 2025 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

## राज्याच्या इतिहासात प्रथमच वीजदरात कपात

### मुख्यमंत्र्यांनी मानले महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाचे आभार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वीज ग्राहकांसाठी आनंदाची बातमी! इतिहासात प्रथमच पाचही वर्षात वीजदर कमी होणार

वीजग्राहकांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. राज्यातील वीज ग्राहकांसाठी वीजदर ठरवण्यासाठी महावितरणने दाखल केलेल्या याचिकेवर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने निर्णय दिला आहे. घरगुती, औद्योगिक आणि व्यावसायिक अशा सर्व ग्राहकांच्या वीजदरात आगामी पाचही वर्षात कपात करण्याचा आदेश दिला आहे. राज्याच्या इतिहासात प्रथमच वीजदरात कपातीचा प्रस्ताव महावितरणकडून सादर झाला आणि आयोगाने आगामी पाचही वर्षात वीजदर कमी करण्याचा आदेश दिला आहे.

स्मार्ट मीटर असलेल्या घरगुती ग्राहकांना दिवसा वीज वापरासाठी दहा टक्के अतिरिक्त टीओडी सवलत आणि सौर ऊर्जा निर्मिती करणाऱ्या घरगुती ग्राहकांना प्रोत्साहन ही या आदेशाची वैशिष्ट्ये आहेत. राज्य सरकारने मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना सुरू केल्यामुळे साडेसात एचपीपर्यंतचे पंप असलेल्या राज्यातील ४५ लाख शेतकऱ्यांना मोफत वीज मिळत आहे. वीजदर कमी करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही महत्त्वाकांक्षी योजना उपयुक्त ठरत आहे. शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी अंमलात येणाऱ्या या योजनेत विकेंद्रित स्वरुपात सौर ऊर्जेद्वारे वीज तयार करून त्यावर पंप चालविण्यात येणार आहेत. या योजनेची क्षमता १६ हजार मेगावॅट इतकी असेल व त्या माध्यमातून सरासरी ३ रुपये प्रती युनिट इतक्या कमी दराने वीज उपलब्ध होणार आहे. डिसेंबर २०२६ पर्यंत योजना पूर्ण होणे अपेक्षित आहे. शेतकऱ्यांना दिलासा देतानाच महावितरणच्या वीजखरेदी खर्चात कपात करण्यासाठी ही योजना महत्त्वाची ठरली आहे.



महावितरणने नजिकच्या भविष्यातील विजेची गरज ध्यानात घेऊन रिसोर्स डेक्कसी प्लॅन तयार केला असून त्यानुसार २०३० पर्यंत राज्याची विजेची क्षमता ८१ हजार मेगावॅट होण्यासाठी ४५ हजार मेगावॅटचे वीजखरेदी करार केले आहेत. त्यापैकी ३१ हजार मेगावॅट वीज रिन्युएबल अर्थात नवीकरणीय ऊर्जास्त्रोतांमधून मिळणार आहे. ही वीज अत्यंत किफायतशीर दरात मिळणार असल्याने आगामी पाच वर्षात महावितरणचे वीजखरेदीचे ६६ हजार कोटी रुपये वाचणार आहेत. त्यामुळे महावितरणला वीजदर कपातीचा प्रस्ताव मांडता आला आणि आयोगानेही त्यानुसार आदेश दिला.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने महावितरणच्या याचिकेनुसार प्रथमच वीजदर कपातीचा आदेश दिला आहे. वीजदर कपातीमुळे घरगुती ग्राहकांना दिलासा मिळतानाच उद्योग व्यवसायांना चालना मिळणार आहे. मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वसामान्य घरगुती ग्राहकांच्या वीजदरात कपात करण्याचे आश्वासन दिले होते व त्याचे पालन झाले आहे. दरवर्षी औद्योगिक व व्यावसायिक वीजदरात दहा टक्के वाढ होत होती. त्याऐवजी आता पुढील पाच वर्षात या घटकांच्या वीजदरात कपात होणार आहे. मा. पंतप्रधानांच्या स्वप्नाला अनुसरून मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात राज्याला एक ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था करण्याला वीजदर कपातीमुळे महत्त्वाचे योगदान मिळणार आहे. ग्राहकांना किफायतशीर दरात दर्जेदार वीज पुरवठा करण्यास महावितरण वचनबद्ध आहे.

राज्याच्या इतिहासात प्रथमच पहिल्यावर्षी १० टक्के आणि टप्प्याटप्प्याने कपात करीत ५ वर्षांत २६ टक्के वीजदर कमी होणार आहेत. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने (एमईआरसी) हा निकाल महावितरणच्या याचिकेवर दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले आहे.

साधारणत: पूर्वीचा काळ पाहिला तर १० टक्के वीजदरवाढीच्या याचिका सादर व्हायच्या. पण, राज्याच्या इतिहासात प्रथमच महावितरणने वीजदर कमी करण्यासाठी याचिका केली. त्यावरच हा आदेश एमईआरसीने दिला. या आदेशाचा लाभ घरगुती ग्राहक, औद्योगिक ग्राहक आणि व्यावसायिक ग्राहक अशा तिन्ही वर्गवारीत होणार आहे. राज्यात १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणार्यांचे प्रमाण हे ७० टक्के आहे. त्यांच्यासाठी १० टक्के इतके सर्वाधिक दर कमी होतील. आमच्या बळीराजाला दिवसा आणि खात्रीचा वीजपुरवठा होण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० चे काम युद्धपातळीवर सुरु आहे. सोबतच आगामी काळात वीजखरेदी करारांमध्ये हरितऊर्जेवर मोठ्या प्रमाणात भर दिल्यामुळे वीजखरेदी खर्चात बचत होणार आहे. त्यामुळेच हा दर कमी करण्याचा प्रस्ताव महावितरणला मांडता आला. ही बातमी राज्यातील जनतेला देताना मला आनंद होतो आहे असे फडणवीस म्हणाले.

### सोलापुरात भाजपला धक्का

## शोभा बनशेट्टी यांचा एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

सोलापूरच्या राजकारणात आणखी एक मोठी बातमी समोर आली असून भारतीय जनता पार्टीला धक्का देत माझे महापौर शोभा बनशेट्टी यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. बुधवारी सायंकाळी मुंबईमध्ये हा प्रवेश झाला.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बनशेट्टी परिवाराचे स्वागत केले. नुकतेच शिवसेनेत दाखल झालेली माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, आमदार नारायण पाटील, सोलापूर लोकसभा संपर्कप्रमुख महेश (नाना) साठे, महिला आघाडीच्या नित्या अनिता माळगे, प्रियंका परांडे, श्री शैल्य बनशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती होती विशेष म्हणजे या प्रवेशा वेळी काँग्रेसचे नेते अशोक निम्बर्गी यांची उपस्थिती चर्चेचा विषय ठरत आहे.

भारतीय जनता पार्टी कडून महापूर राहिलेल्या शोभा बनशेट्टी यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टी कडून शहर उत्तर मध्ये उमेदवारी मागितली होती परंतु पक्षाने पुन्हा विजयकुमार देशमुख यांना उमेदवारी दिल्याने त्यांनी बंडखोरी केली तेव्हापासून त्या राजकारणातून लांब दिसून आल्या.

दरम्यान अचानक त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केल्याने अनेकांना जोरदार धक्का दिला आहे. या प्रवेशात माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, जिल्हा महिला आघाडीच्या नेत्या अनिता माळगे यांचा वाटा असल्याचे बोलले जात आहे.

## ९५ हजारांची लाच घेताना पोलीस निरीक्षकांसह महिला पोलीस अटकेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव : राज्यात गेल्या काही महिन्यांपासून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईने जोर धरला असून अनेक बडे मासे जाळ्यात अडकत आहेत. विशेषत: महसूल खात्यात तहसिलदार, तलाठी ते ग्रामसेवकांपर्यंत अनेक अधिकारी लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात अडकले आहेत. आता, पोलीस खात्यातील अधिकाऱ्यावर एसीबीने कारवाई केली आहे. दोन लाख रुपयांच्या लाचेची मागणी करत ९५ हजार रुपये स्वीकारताना धाराशिव ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक व महिला पोलीस अंमलदार यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात अटक केली. याप्रकरणी आरोपींवर पोलिसांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल ३०६ अंतर्गत गुन्ह्यातील आरोपीला मदत करण्यासाठी पोलीस निरीक्षकांकडून लाचेची मागणी करण्यात आली होती, अशी प्राथमिक माहिती आहे. २ लाख रुपयांच्या लाचेची मागणी करुन तडजोडी अंति ९५ हजार रुपये रक्कम घेण्याचे पोलिसांनी मान्य केले होते. मात्र, तक्रारदाराने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केल्यानंतर एसीबीने सापळा रचून ही कारवाई केली. त्यात, धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारुती शेळके व एका महिला अंमलदार लोखंडे यांना लाच लुचपत विभागाने ताब्यात घेतले असून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, मंगळवारी बुलढाणा जिल्ह्यातही लाचलुचपत विभागाने थेट कारवाई करत तलाठ्याला रंगेहात अटक केली होती.

## सिंदखेडराजा तहसील कार्यालयात ७ हजारांची लाच घेताना दोन महसूल कर्मचाऱ्यांना एसीबीच्या पथकाने रंगेहाथ पकडले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेडराजा (ता. २४ जून २०२५): लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बुलढाणा यांनी सिंदखेडराजा येथील तहसील कार्यालयात लाचखोरी प्रकरणात मोठी कारवाई केली आहे. दोन महसूल कर्मचाऱ्यांना तब्बल ७,००० रुपयांची लाच घेताना रंगेहात पकडण्यात आले आहे त्यात आरोपीं रावसाहेब बाबुराव काकडे - तलाठी, वय ५० वर्षे, ता. सिंदखेडराजा, व मनोज काशीराम झीणे - महसूल सहायक, वय ४५ वर्षे, कार्यरत: तहसील कार्यालय सिंदखेडराजा.

सविस्तर सविस्तर वृत्त,तक्रारदार व्यक्तीस शिवारातील शासकीय शेतजमिनीचा नामांतरी व्यवहार लवकर करण्यासाठी आरोपी तलाठ्याने ७,००० रुपये लाचेची मागणी २० जून २०२५ रोजी केली होती. त्या बाबत तक्रारदाराने ही माहिती एसीबीकडे दिल्यानंतर २४ जून रोजी पोलिस निरीक्षक श्री. भागोजी सातपुते यांच्या नेतृत्वाखाली सापळा रचण्यात आला. आरोपींना रु. ७,००० लाच स्वीकारताना तहसील कार्यालयात रंगेहात पकडण्यात आले.

सदरकार्यवाही मा.श्री. मारुती जगताप, पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती २.मा.श्री. सचिंद्र शिंदे, अप्पर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, परिक्षेत्र अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री. भागोजी चोरमले, पोलीस उपअधिक्षक, पोलीसं निरीक्षक, श्री. रमेश पवार, ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा, व सोबत सापळा पथक एएसआय, शाम भांगे, पोहेकॉ. प्रविण बैरागी, राजेंद्र क्षिरसागर, पोना / जगदिश पवार, विनोद लोखंडे, पोकॉ. शैलेश सोनवणे, रंजीत व्यवहारे, चापोना नितीन शेटे, चापोकों/ शेख अरशद, ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलढाणा यांनी पार पाडली.एसीबी व इतर सहकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या तत्परतेने ही कारवाई यशस्वी ठरली या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा कलम ७ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास एसीबीकडून सुरू आहे.

लाचखोरीला चाप बसावा आणि शासकीय व्यवहार पारदर्शक व्हावेत, यासाठी ही कारवाई महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

### चंद्रराव तावरे एकाकी झुंजले

### शरद पवार पॅनेलचा सुपडा साफ

## माळेगाववर अजित पवारांचे वर्चस्व, २१ पैकी २० जागा जिंकल्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बारामती : राज्याचे लक्ष लागलेल्या माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीचा निकाल अखेर जाहीर झाला आहे. कारखान्यावर अजित पवारांनी वर्चस्व मिळवलं असून त्यांच्या निळकंठेश्वर पॅनेलला २१ पैकी २० जागा मिळवल्या. तर सहकार बचाव पॅनेलला एक जागा मिळवली. दुसरीकडे शरद पवारांच्या बळीराजा पॅनेलचा मात्र सुपडा साफ झाला.

माळेगाव सहकारी साखर कारखान्यासाठी २२ जून रोजी मतदान पार पडले. त्याची मतमोजणी जवळपास ३५ तास चालली. त्यामध्ये माळेगाव सहकारी साखर कारखान्यावरती उपमुख्यमंत्री अजित पवारांचे वर्चस्व कायम राहिलं आहे. तर विरोधी गटाकडून सहकार बचाव पॅनलचे चंद्रराव तावरे एकमेव विजयी उमेदवार ठरले आहेत.

माळेगावची निवडणूक ही चुरशीने झाल्याचं दिसून आलं. अजित पवारांच्या निळकंठेश्वर पॅनेलला चंद्रराव आणि रंजन तावरेंच्या सहकार बचाव पॅनेलने चांगलीच झुंज दिली. सांगवी गटातून चंद्रराव तावरे विजयी झाले. विरोधी गटाचे विजयी झालेले ते एकमेव उमेदवार ठरले. त्यांनी अजितदादांच्या विरेंद्र तावरे यांचा पराभव केला.



सहकार बचाव पॅनलचे रंजन तावरे यांनी हा पराभव मान्य असल्याचं सांगत अजित पवारांवर टीका केली. हा जनशक्तीविरोधात धनशक्तीचा विजय असल्याचा आरोप केला. अजित पवारांचे स्वप्न पूर्ण झालं नसल्याचंही रंजन तावरे म्हणाले. रंजन तावरे यांचाही या निवडणुकीत पराभव झाला आहे.

दुसरीकडे शरद पवार-युगेंद्र पवार यांच्या नेतृत्वाखाली लढत असलेल्या बळीराजा सहकार बचाव पॅनेलचा सुपडा साफ झाला. त्यांच्या पॅनेलचा एकही उमेदवार निवडून आला नाही.

निळकंठेश्वर पॅनलचे विजयी उमेदवार

ब वर्ग

१) अजित पवार

**भटक्या विमुक्त राखीव**

२) श्री विलास देवकाते

**अनुसूचित जाती राखीव**

३) रतन कुमार भोसले

**इतर मागासवर्ग राखीव**

४) नितीन कुमार शेंडे

**महिला राखीव**

५) सौ संगीता कोक ६) सौ ज्योती मुलमुले

**माळेगाव गट : ०१**

७) शिवराज जाधवराव ८) राजेंद्र बुरुंगले ९) बाळासाहेब तावरे

**पणदारे गट : २**

१०) योगेश जगताप ११) तानाजी कोकरे १२) स्वप्नील जगताप

**सांगवी गट : ०१**

१३) चंद्रराव तावरे १४) गणपत खलाटे १५) विजय तावरे

**शिरवली गट**

१६) प्रताप आटोळे १७) सतिश फाळके

**बारामती गट**

१८) नितीन सातव १९) देविदास गावडे

**नीरावागज गट**

२०) जयपाल देवकाते २१) अविनाश देवकाते

## होर्डिंग्जसाठी राज्यात नवे धोरण लवकरच : महसूलमंत्री बावनकुळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात रिकाम्या असलेल्या शासकीय जमिनींवर जाहिरात फलक उभारण्यासाठी धोरण निश्चित करण्यात येत असून महसूलवाढीसह जिल्हाधिकाऱ्यांसाठी नवीन मार्गदर्शक सूचना ठरविण्यात आल्या आहेत. बुधवारी महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेश कुमार यांच्यासोबत वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांनी याबाबतचे सविस्तर सादरीकरण महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व राज्यमंत्री योगेश कदम यांच्या उपस्थितीत केले. यावेळी बावनकुळे यांनी या धोरणाची रूपरेषा तयार करताना सर्व जिल्ह्यांचा सर्वसमावेशक विचार करण्याचे निर्देश दिले.

शासकीय जमिनीवर जाहिरात फलक उभारण्यासाठी मार्गदर्शक सूचना ठरविण्यात आल्या आहेत. प्रत्येक जिल्हाधिकाऱ्याने आपल्या जिल्ह्यात जाहिरात फलकांसाठी योग्य शासकीय जमिनी निश्चित कराव्या. यामध्ये जागेचे क्षेत्रफळ आणि फलकांचे आकारमान नमूद करून ई-लिलाव प्रक्रिया राबवावी. लिलावात पात्र ठरलेल्या निविदाकाराने प्रत्येक तिमाहीत किमान सात दिवस शासकीय जाहिरातीसाठी फलक विनामूल्य उपलब्ध करावेत. भाडेपट्ट्याचा कालावधी संपल्यानंतर करार संपुष्टात येईल. कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नाही. न्यायालयीन स्थगितीमुळे मुदतवाढ झाल्यास देणार रकमेच्या दुप्पट शुल्क आकारले जाईल.

भाडेपट्ट्याच्या मुदतीपूर्वी सहा महिन्यांत पुढील ई-लिलावाची प्रक्रिया पूर्ण करणे जिल्हाधिकाऱ्यांसाठी बंधनकारक असेल. जाहिरात फलक उभारण्यापूर्वी भाडेपट्टाधारकाने नियोजन प्राधिकरण, जिल्हाधिकारी आणि इतर संबंधित प्राधिकरणांची परवानगी घेणे आवश्यक आहे. सर्व परवानगीप्राप्त, मुदत संपलेली किंवा रद्द केलेली जाहिरात फलकांची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दरमहा शासनाला सादर करावी. जाहिरात फलकांसाठी वार्षिक अनुज्ञप्ती शुल्क आकारले जाईल, ज्याची रक्कम धोरणात नमूद केली जाईल, इत्यादींचा समावेश आहे. धोरण पारदर्शक, स्थानिक हितांचे रक्षण करणारे आणि महसूलवाढीला चालना देणारे असावे. संबंधित एजन्सी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडे नोंदणीकृत असावी. कंपनीला किमान तीन वर्षांचा अनुभव असावा. निविदा प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या एजन्सीचा मालक हा मूळचा महाराष्ट्राचा रहिवासी असावा. ही प्रक्रिया पूर्णपणे महसूल विभागाच्या देखरेखीखाली राबवली जाईल, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

## संपादकीय....

### राज्याचे नवे धोरण

राज्यात रिकाम्या असलेल्या शासकीय जमिनींवर जाहिरात फलक उभारण्यासाठी धोरण निश्चित करण्यात येत असून महसूलवाढीसह जिल्हाधिकाऱ्यांसाठी नवीन मार्गदर्शक सूचना ठरविण्यात आल्या आहेत. बावनकुळे यांनी या धोरणाची रूपरेषा तयार करताना सर्व जिल्ह्यांचा सर्वसमावेशक विचार करण्याचे निर्देश दिले. शासकीय जमिनीवर जाहिरात फलक उभारण्यासाठी मार्गदर्शक सूचना ठरविण्यात आल्या आहेत. प्रत्येक जिल्हाधिकाऱ्याने आपल्या जिल्ह्यात जाहिरात फलकांसाठी योग्य शासकीय जमिनी निश्चित कराव्या. यामध्ये जागेचे क्षेत्रफळ आणि फलकांचे आकारमान नमूद करून ई-लिलाव प्रक्रिया राबवावी. लिलावात पात्र ठरलेल्या निविदाकाराने प्रत्येक तिमाहीत किमान सात दिवस शासकीय जाहिरातीसाठी फलक विनामूल्य उपलब्ध करावेत. भाडेपट्ट्याचा कालावधी संपल्यानंतर करार संपुष्टात येईल. कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नाही. न्यायालयीन स्थगितीमुळे मुदतवाढ झाल्यास देणार रकमेच्या दुप्पट शुल्क आकारले जाईल. भाडेपट्ट्याच्या मुदतीपूर्वी सहा महिन्यांत पुढील ई-लिलावाची प्रक्रिया पूर्ण करणे जिल्हाधिकाऱ्यांसाठी बंधनकारक असेल. जाहिरात फलक उभारण्यापूर्वी भाडेपट्टाधारकाने नियोजन प्राधिकरण, जिल्हाधिकारी आणि इतर संबंधित प्राधिकरणांची परवानगी घेणे आवश्यक आहे. सर्व परवानगीप्राप्त, मुदत संपलेली किंवा रद्द केलेली जाहिरात फलकांची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दरमहा शासनाला सादर करावी. जाहिरात फलकांसाठी वार्षिक अनुज्ञप्ती शुल्क आकारले जाईल, ज्याची रक्कम धोरणात नमूद केली जाईल, इत्यादींचा समावेश आहे. धोरण पारदर्शक, स्थानिक हितांचे रक्षण करणारे आणि महसूलवाढीला चालना देणारे असावे. संबंधित एजन्सी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडे नोंदणीकृत असावी. कंपनीला किमान तीन वर्षांचा अनुभव असावा. निविदा प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या एजन्सीचा मालक हा मूळचा महाराष्ट्राचा रहिवासी असावा. ही प्रक्रिया पूर्णपणे महसूल विभागाच्या देखरेखीखाली राबवली जाईल.

# छत्रपती शाहू महाराज...लोक कल्याणकारी राजा!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

२६ जून रोजी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म झाला. शाहू महाराजांनी त्यांच्या संपूर्ण जीवन कार्यात लोककल्याणाचे व समाज उद्धाराचे कार्य केले. त्यांनी केलेल्या कार्यामुळे त्यांना लोककल्याणकारी राजा असे संबोधले जाते. महाराष्ट्र शासनामार्फत त्यांचा जन्मदिन हा संपूर्ण राज्यात सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो. शाहू महाराजांनी केलेल्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक कार्याची माहिती घेतल्यानंतर त्यांना लोक कल्याणकारी राजा का? म्हटले जाते याची प्रचिती येते.

छत्रपती शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव जयसिंगराव घाटगे यांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागलच्या जहागीरदार घाटगे घराण्यात जयसिंगराव आणि राधाबाई ह्या दांपत्याच्या पोटी झाला. चौथ्या शिवाजींच्या अकाली निधनानंतर ते कोल्हापूरच्या गादीवर दत्तक गेले(१७ मार्च १८८४).

छत्रपती शाहू महाराजांवर महात्मा फुले व सत्यशोधक समाजाचा मोठा प्रभाव होता. छत्रपती शाहू महाराज हे सामाजिक चळवळीच्या क्षेत्रातील महात्मा फुले यांचे खरेखुरे वारसदार होते. सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्तानला आवश्यकता आहे असे सांगून त्यांनी कोल्हापूर संस्थानात शिक्षणासाठी सवलती जाहीर केल्या. महाराष्ट्राने छत्रपती शाहू महाराजांचा शेतकऱ्यांचा खरा राजा म्हणून गौरव केला. भारतातील वस्तीगृहाचे आद्य जनक म्हणून छत्रपती शाहू महाराजांचा गौरव केला जातो. ते कल्याणकारी राजा होते.

एप्रिल १९१९ भारतात बहुजन समाजाच्या उद्धाराचे कार्य करणाऱ्या अखिल भारतवर्षीय क्षत्रिय महासभा या संस्थेच्या कानपुर येथे भरलेल्या १३ व्या अधिवेशनात शाहू महाराजांना त्यांच्या कार्याबद्दल राजर्षी ही पदवी बहाल करण्यात आली.

ग्रामीण भागातून शहरी भागात शिकण्यास येणाऱ्या विविध जाती-धर्माच्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जातीची वस्तीगृह स्थापन शाहू महाराजांनी केली. तर सन १९०१ मध्ये मराठा विद्यार्थ्यांसाठी विक्टोरिया मराठा बोर्डिंग ची स्थापना कोल्हापूर येथे केली. तर नाशिक येथे उदोजी विद्यार्थी वस्तीगृह उभारून शहरी भागात विद्यार्थ्यांच्या राहण्याची व्यवस्था केल्याने त्या गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे शक्य झाले.

सन १९०२ मध्ये शाहू महाराजांनी राज्यातील मागासवर्गीयांसाठी प्रशासकीय सेवा मध्ये ५० टक्के जागा राखीव ठेवल्या. तसेच महाराजांनी १५ नोव्हेंबर १९०६ किंग एडवर्ड मोहमेडन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. सन १९०७ मध्ये मिस क्लार्क बोर्डिंग हाऊस ची स्थापना अस्पृश्य विद्यार्थ्यासाठी करून त्या विद्यार्थ्यांच्या राहण्याची व्यवस्था केली. सन १९११ मध्ये कोल्हापूर संस्थानात जाहीरनामा काढून त्यानुसार १५ टक्के विद्यार्थ्यांना नादारी देण्याची घोषणा करून गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे खुली केली.



शाहू महाराजांनी १९११ मध्ये शिक्षक प्रशिक्षण व शिक्षकांसाठी मेरीट प्रमोशन योजना राबवले. तर १९१७ मध्ये आदेश काढून माध्यमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. व कोल्हापूर संस्थानातील गोरगरीब घरातील मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. १४ फेब्रुवारी १९१९ पाटील शाळा व त्याला जोडून तलाठी वर्ग सुरू करण्याचा जाहीरनामा काढला.

बहुजन समाज शिकून शहाणा झाल्याशिवाय त्यांचे दारिद्र, अज्ञान व अंधश्रद्धा नष्ट होणार नाहीत, हे जाणून शाहूंनी शिक्षणाच्या, विशेषतः प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारावर भर दिला. त्यानुसार त्यांनी आपल्या संस्थानात सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला आणि तो अमलात आणला. प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा सुरू केली. प्राथमिक शिक्षणावर या संस्थानात होणारा खर्च मोठा होता.

लष्करी शिक्षणासाठी इन्फंट्री स्कूल सुरू केले व पुणे येथे श्री शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल तर जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिट्यूट ची स्थापना करून शाहू महाराजांनी तांत्रिक शिक्षणाला महत्त्व देण्याबरोबरच लष्करी शिक्षणाची दारे खुली केली.

शाहू महाराजांनी सन १९१७ मध्ये विधवा विवाहाचा कायदा करून पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता दिली तर १९१८ मध्ये आंतरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदा केला. व समाजातील अनिष्ठ चाली-रीती वर हल्ला चढवला. १९१८ मध्ये महार वतने रद्द करून जमिनी रयतवारीने करून दिल्या व वेठबिगारी प्रथा कायद्याने बंद केली व १९२० मध्ये माणगाव अस्पृश्यतानिवारण परिषदेचे आयोजन केले.

छत्रपती शाहू महाराज यांनी व्यवसाय निर्बंध दूर करून अस्पृश्यांना व्यवसाय स्वातंत्र्य दिले. जातिभेदास तीव्र विरोध केला महाराजांच्या या सर्व लोक कल्याणकारी कार्यामुळे खरेखुरे लोककल्याणकारी राजा होते. पददलित व मागासवर्गीयांची उन्नती हेच छत्रपती शाहू महाराजांनी जीवितकार्य मानले. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही अशी घोषणा त्यांनी केली. उदार विचारप्रणालीचा राजा होते. राज्य सोडावे लागले तरी बेहत्तर पण मागासलेल्या प्रजेच्या सेवेचे व्रत सोडणार नाही, असे शाहू महाराजांनी ठासून सांगितले. कामगारांनो संघटित व्हा व आपले हक्क प्राप्त करून घ्या असा संदेश त्यांनी दिला. क्श्ृरी र ज्ञळपस. ईीं वशो-लीरींळल ज्ञळपस. असे गौरवउद्गार भाई माधवराव बागल यांनी शाहू महाराजांबद्दल काढले. तर थोर समाज सुधारक विठ्ठल रामजी शिंदे शाहू महाराजा बद्दल म्हणाले की,

शाहू राजा नुसता मराठा नव्हता ब्रह्मतोतर ही नव्हता. तो नव्या युगातील सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष होता. तो महाराष्ट्राच्या विकासाचा स्वाभाविक तरंग होता.

**सुनील सोनटक्के**
**जिल्हा माहिती अधिकारी ,सोलापूर**

# मोदी सरकारचा कार्यकाळ देशाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल : चेतन सिंह केदार सावंत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर/प्रतिनिधी

विकसित भारत, आत्मनिर्भर भारत आणि संकल्प हे सिद्ध या मंत्राने मोदी सरकारचा कालखंड ओळखला जाईल, अकरा वर्षाच्या प्रवासात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या उज्वल भविष्याची पायाभरणी केली. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केल्याने विकासाला गती मिळाली आहे. जिथे भाजप सरकार सत्तेवर आहे त्या ठिकाणी गरिबांचा विकास झाला आहे. सरकार म्हणजे सेवा या हेतूने काम केले जात असल्याने सुशासन ही देशाची संस्कृती बंदी आहे विकसित भारताचा अमृत काल सेवा सुशासन गरीब कल्याणाची अकरा वर्षे यामुळे मोदी सरकारचा कार्यकाळ देशाच्या इतिहासात सुवर्ण अक्षराने लिहिला जाईल असे मत भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार सावंत यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

मोदी सरकारच्या अकरा वर्षाच्या कार्यकाळातील विकासाच्या दृष्टीने भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार सावंत यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन केली होती त्यावेळी ते बोलताना म्हणाले की गेल्या अकरा वर्षात भारताने अमृत काळात विकसित राष्ट्र बनवण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरू केली आहे २०१४ पूर्वी सामान्य माणूस अधिकारी हे कसे शक्य ते शक्य नाही असे म्हणत असे आता गेल्या अकरा वर्षातील मोदी सरकारने केलेली कामे बघता वही शक्य आहे हे झालेच पाहिजे मोदी सरकार असल्यामुळे हे नक्कीच होणार असे सामान्य माणूस मोठ्या विश्वासाने मनू लागला आहे मोदी सरकारने भारतीय राजकारणात कार्यक्षमतेची राजकारण हा नवा शब्दप्रयोग प्रत्यक्षात आणला आहे आपण जनतेला जबाबदार आहोत हे लक्षात ठेवून मोदी सरकारने कारभार केला आहे सरकारी कारभारात पारदर्शकता आणून वेगवेगळ्या सुधारणा करून मोदी सरकारने आपल्या नव्या संस्कृतीचा परिचय दिला आहे व २०१४ पूर्वी देश भ्रष्टाचाराने पोखरला होता देशात आणि घोटाळे घडत होती




देशात लंचनालाचे राजकारण सुरू होते मोदी सरकारने मात्र देशात विकासाची युग सुरू केली सरकारने डीबीटी प्रणालीचा वापर करत सामान्य माणसाचे थेट बँक खात्यात लाभ पोहोचवण्याची काम केले आहे सामान्य माणसाला वैद्यकीय उपचार केल्या जाणाऱ्या खर्चाची भीती वाटत असेल मोदी सरकारने पाच लाखापर्यंतचे वैद्यकीय उपचार आयुष्यमान भारत योजना अंतर्गत मोफत उपलब्ध केले आहे मेक इन इंडिया मुळे अनेक वस्तू आणि सेवांची निर्यात करत आहोत आता आपण जगात पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनलो आहोत चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्थेच्या बनण्याकडे भारताची वाटचाल सुरू आहे.

गेल्या अकरा वर्षात सबका साथ सबका विकास व सबका विश्वास या संकल्पनेतून राज्य सरकार होत असल्यामुळे प्रत्येक नागरिक याचा साक्षीदार ठरला आहे भारताच्या विकासाची श्रेय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतःकडे घेतले असून १४० कोटी भारतीयांना याचे श्रेय दिले आहे ऑपरेशन शेंदूर मुळे सुरक्षित भारत समृद्ध भारत या मंत्राचा परिचय जगाला झाला आहे भारतावर दहशतवादी मार्गाने हल्ला चढवला तर दहशतवादाच्या देशात घुसून जशास तसे उत्तर दिले जाईल हे ऑपरेशन सिंदूर मुळे जगाला कळले आहे ऑपरेशन शेंदूर मध्ये भारतात बनवलेल्या शास्त्रज्ञांनी क्षेपणास्त्रज्ञांनी मोठी कामगिरी बजावली आहे भारतात तयार केलेल्या शास्त्रज्ञांची पाकिस्तानात यशस्वी चाचणी झाल्यामुळे भारतात बनवलेल्या संरक्षण उत्पादनाची विश्वासार्हता जगात तयार झाले आहे.

# जड वाहतुक नियमन जाहीरनामा

सोलापूर दि.२४ (जिमाका):- श्री क्षेत्र पंढरपूर येथे दि. ३० जून २०२५ ते १० जुलै २०२५ या कालावधीत आषाढीवारी भरणार असुन सदर यात्रा कालावधीत पंढरपूर शहरातून जाणा-या जड वाहतुकीमुळे पंढरपूर शहरात दाखल होणा-या भाविकांच्या जिवितेला धोका व वाहतुक नियमनास अडथळा होवू नये याकरीता उपविभागीय पोलीस अधिकारी, पंढरपूर उपविभाग पंढरपूर यांनी त्यांचेकडील पत्र जावक क्रं २३००/२०२५ दि. ०५ जून २०२५ अन्वये व पंढरपूर शहराकडे येणारी जड- अवजड वाहतुक संबंधीत पोलीस ठाणे हददीतील योग्य त्या पॉईंटवरून बंद करून ती अन्य पर्यायी मार्गाने वळविणेबाबत निदर्शनास आणून दिले आहे. तसेच कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग विभाग सोलापूर यांनी त्यांचेकडील पत्र क्र. १५२७/२०२५ दि. ०९ जून २०२५ अन्वये आषाढीवारी कालावधीमध्ये वेळापूर ते महुद ते सांगोला या मार्गावरून एकेरी जड वाहतूक ४० किमी वेगमर्यादेचे बंधन घालून चालू करणेबाबत आमचे निदर्शनास आणून दिले आहे.

महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (१) (ब) अन्वये अधिकारान्वये जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कुमार आशीर्वाद व पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण अतुल वि. कुलकर्णी यांच्या आदेशान्वये भाविकांचे सुरक्षिततेच्या कारणावरून दिनांक ३० जून २०२५ रोजी ००.०१ ते दिनांक ०८ जुलै २०२५ रोजी २४.०० वा. पर्यंत पंढरपूर शहर बाहय मार्गावरून जाणारी जड वाहतूक अन्य पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक असल्याने खालील नमूद ठिकाणावरून जड-अवजड वाहतूक (शासकीय अन्नधान्य, डिझेल, पेट्रोल, गैस सिलेंडर, उस वाहतुक करणारी वाहने वगळुन) बंद करणेबाबत निर्देशित करीत आहोत.

पर्यायी मार्ग -

पोलीस ठाणे- मोहोळ- जड वाहतुक प्रवेश बंद ठिकाणे- शिवाजी चौक - पर्यायी मार्ग -मोहोळ -कामती-मंगळवेढा-सांगोला किंवा मोहोळ-शेटफळ-टेंभुर्णी-इंदापूर

पोलीस ठाणे-मोहोळ- जड वाहतुक प्रवेश बंद ठिकाणे- शेटफळ चौक- पर्यायी मार्ग- शेटफळ टेभुणी इंदापूर किंवा शेटफळ-मोहोळ-कामती-मंगळवेढा-सांगोला.

पोलीस ठाणे-मोहोळ- पोलीस ठाणे - टाकळी सिकंदर - पर्यायी मार्ग- टाकळी सिकदर-कुरूल-मोहोळ-शेटफळ-टेभुणी किंवा टाकळी सिंकदर-कुरूल-कामती-मंगळवेढा-सांगोला

पोलीस ठाणे - जड वाहतुक प्रवेश बंद ठिकाणे-पेनुर - पर्यायी मार्ग- पेनुर-मोहोळ-कामती-मंगळवेढा-सांगोला किंवा पेनुर-मोहोळ-शेटफळ-टेभुर्णी.

पोलीस ठाणे -कामती -जडवाहतुक प्रवेश बंद ठिकाण -कुरूल चौक- कुरूल-कामती-मंगळवेढा-सांगोला किंवा कुरूल-मोहोळ-शेटफळ-टेंभुर्णी.

पोलीस ठाणे- टेंभूर्णी - जडवाहतुक प्रवेश बंद ठिकाण -वेणेगाव फाटा- वेणेगाव-टेभुणों-इंदापूर किंवा वेणेगाव-शेटफळ-मोहोळ-कामती-मंगळवेढा- सांगोला.

पोलीस ठाणे- टेंभूर्णी- जडवाहतुक प्रवेश बंद ठिकाण- अकलुज चौक-पर्यायी मार्ग- टेभुर्णी-शेटफळ-मोहोळ-कामती-मंगळवेढा-सांगोला किंवा टेभुर्णी-इंदापूर.

दिनांक ०३ जुलै २०२५ रोजी २०.०० पासूनअकलूज चौकातून सर्व प्रकारची वाहतुक चालू राहील

पोलीस ठाणे -वेळापूर -जड वाहतूक प्रवेश बंद ठिकाण -श्री ज्ञानेश्वर चौक पर्यायी मार्ग - वेळापूर ते साळमुख ते महुद-सांगोला-मंगळवेढा-कामती.

पोलीस ठाणे -वेळापूर -जड वाहतूक प्रवेश बंद ठिकाण -साळमुख चौक-पर्यायी मार्ग-साळमुख ते महुद-सांगोला -मंगळवेढा-कामती.

पोलीस ठाणे-सांगोला -जडवाहतुक प्रवेश बंद ठिकाण-महुद चौक- पर्यायी मार्ग-महुद-सांगोला-मंगळवेढा-कामती-मोहोळ

पोलीस ठाणे-सांगोला -जडवाहतुक प्रवेश बंद ठिकाण- मंगळवेढा-कोल्हापूर बायपास पुलाखाली-पर्यायी मार्ग- सांगोला-मंगळवेढा-कामती-मोहोळ-शेटफळ-टेभुर्णी.

पोलीस ठाणे-मंगळवेढा -जडवाहतुक प्रवेश बंद ठिकाण- मंगळवेढा नाका बायपास-पर्यायी मार्ग- मंगळवेढा-कामती-मोहोळ शेटफळ टेंभुर्णी किंवा मंगळवेढा-सांगोला

पोलीस ठाणे-करकंब -जडवाहतुक प्रवेश बंद ठिकाण- भोसे पाटी-पर्यायी मार्ग- करकंब वेणेगाव-टेंभुर्णी-इंदापूर मार्गे पुढे इच्छितस्थळी किंवा करकंब वेणेगाव-शेटफळ-मोहोळ-कामती-मंगळवेढा-सांगोला.

दि. ०३ जुलै २०२५ रोजी २०.०० पासून टेंभूर्णी येथील अकलुज चौकातून अकलूज, वेळापूर, महुद, सांगोला या मार्गाने जाणारी सर्व प्रकारची वाहतुक चालू राहील. दिनांक ०९ जुलै २०२५ रोजी ००:०१ वाजेपासुन वेळापूर ते महुद ते सांगोला जाणारी जड वाहतुक क्र. जिवानिशा/सांगोला/महुद/जडवाहतुक बंद/२०२४/२०० दि. २६ /०२/२०२४ च्या आदेशा प्रमाणे बंद राहील.

सदरचा आदेश हा दि. ३० जुन २०२५ रोजी ००.०१ ते ०८ जुलै २०२५ रोजी २४.०० वाजे पर्यत अंमलात राहील आषाढीवारी कालावधी संपताच जा.क्रं/जिवाशा/पंढरपूर जड वाहतुक नियमन /२०१९/१९ दिनांक ०७/०४/२०१९ तसेच क्र. जिवानिशा/सांगोला/महुद/जडवाहतुक बंद/२०२४/२०० दि. २६/०२/२०२४ चा आदेश पुर्ववत अंमलात राहील. असा आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कुमार आशीर्वाद (भा.प्र.से.) व पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण अतुल वि. कुलकणी (भा.पो. से.) यांनी दिला आहे.

## सावित्रीरत्न पुरस्कार व विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ

## सुधाकर इंगळे महाराज यांचे प्रतिपादन

# जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी अभ्यास, चिंतनाची गरज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) : तरूणांनी देश, सेवा, परंपरा याची जपणूक करावी. आई-वडीलांनी मुलांना कुठल्या शाळेत घालायचा याचा विचार करण्यापेक्षा त्यांना संस्कार काय द्यावेत यावर चिंतन करण्याची वेळ आली आहे. आपल्याकडे वृध्दाश्रम वाढत आहेत हे कशाच द्योतक आहे याचा विचार करा. आपली भूमी संताची, देशभक्तांची, वीर जवानांची आहे. याची जाणीव ठेवून पुढे जात राहा. गुणांचा, कार्याचा, सेवेचा गौरव झालाच पाहिजे. एखाद्या व्यक्तीच्या कार्याला, गुणाला प्रोत्साहन देण आवश्यक आहे. जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी अभ्यास, चिंतन याची गरज आहे. असे मत अखिल भाविक वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुधाकर इंगळे महाराज यांनी येथे बोलताना मांडले.

जुळे सोलापुरातील व्दारकाधीश मंदिरात रविवारी सायंकाळी सावित्री रत्न' पुरस्काराने दहाजणांचा सन्मान, गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान व एमपीएससी मार्फत नोकरीस लागलेल्या तरुणांचा सत्कार झाला. त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.




सावित्रीबाई फुले शिक्षण व बहुउद्देशीय संस्थेच्या वर्धापन दिनानिमीत्त पुरस्काराचे वितरण व गुणवंताचा गौरव झाला. प्रथम मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच पुजन करण्यात आले.

याप्रसंगी माजी बीडीओ अधिकारी महादेव बेळ्ळे, अक्कलकोट भाजप दक्षिण मंडल अध्यक्ष सुनील खेड, उद्योजक अजित सुतार, निवृत्त मुख्याध्यापक गुरू बिराजदार, निवृत बँक अधिकारी भिमाशंकर विजापूरे, जय फाऊंडेशचे संस्थापक आसिफ यत्नाळ प्रमुख पाहुणे म्हणून होते.

पुढे बोलताना इंगळे महाराज म्हणाले की, समाजामध्ये वावरताना आणि जीवनामध्ये पुढे जाण्यासाठी संत विचार, आई-वडिलांचे संस्कार आणि देवाची सेवा, गुरुची सेवा ही महत्त्वाची आहे. यासाठी आपण नेहमी प्रयत्न केले पाहिजे. माणसाने परमार्थाची सांगड घालावी. आपले प्रत्येक कर्म देवाला अर्पण करावे. जीवनात यशस्वी होण्यासाठी जिद्द कष्ट अपार मेहनत याची गरज आहे, तरच आपण जीवनामध्ये यशस्वी होऊ. कुटुंब एकोपासाठी प्रयत्न करा. पती-पत्नी .आई-वडील. बहिण भाऊ या नात्यातील एकोपा, ओलावा कायम ठेवा, तरच आपण आपला संसार सुखाचा आणि परमार्थ निर्विघ्नपणे पार पडेल.

माजी बीडीओ महादेव बेळ्ळे म्हणाले, पैशाची श्रीमंतीपेक्षा मनाची श्रीमंती जपा. एकमेकाशी सौजन्याने वागा, पुरस्कार हा गुणीजनांचा सन्मान आहे. यामुळे संबधित व्यक्तीलाही आणि पुढच्या माणसालाही प्रेरणा मिळते असे त्यांनी सांगितले. संस्थेचे प्रमुख महादेव जंबगी यांनी प्रस्तावना व स्वागत केले. शिक्षिका अंबुताई बहिर्जे यांनी सूत्रसंचालन केले. आभार सिध्दाराम करपे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रमेश माशाळे, संतोष पवार, सागर सुरवसे, परमेश्वर जंबगी, यल्लप्पा माळी, गौरी जंबगी, ताराबाई माशाळे यांनी परिश्रम घेतले.

### यांचा झाला पुरस्काराने सन्मान

द्रौपती समदुर्ले (आदर्श माता), रेखा सोनकवडे ( मुख्याध्यापिका), सुवर्णा दिंडूरे ( सरंपच आहेरवाडी), सारिका गिडवीर (उद्योजिका), दत्तात्रय पाठक ( मंदिर व्यवस्थापक), संतोष म्हेत्रे ( ग्रामसेवक), सचिन चव्हाण (तलाठी), संजय जाधव (पत्रकार, दिव्य मराठी), संतोष चिवडशेट्टी (पॅथॉलॉजी लॅब), बळवंत बिराजदार (समाजसेवा) याशिवाय फौजदारपदी मल्लिकार्जुन हिप्परगी, स्थापत्य अभियंतापदी विजय सुरवसे, बीमएससी असिस्टंटपदी सुमीत सुर्डी, नगर विकास विभाग (वर्ग २) पदी कु. पुष्पांजली मंगरुळे यांची निवड झाल्याबद्दल आणि सुयश पवार, सिद्धाराम मालगुंडे, साहिल नदाफ, जोया मटकी, ऋतिका कुंभार, पार्वती हडपद, लक्ष्मी गुंडद, नंदिनी खसकी दहावी गुणवंताचा सन्मान, मल्लिकार्जुन वाघमारे, लक्ष्मण जाधव या सेवानिवृत कर्मचाऱ्यांचा सन्मान झाला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# भंडाऱ्याने माऊलींचा रथ न्हावून निघाला, खंडोबांच्या भक्तांकडून संत ज्ञानेश्वरांच्या पालखीचं स्वागत

## लाखो वैष्णवजणांनी घेतलं महादेवाचं दर्शन; भंडाऱ्याने माऊलींचा रथ न्हावून निघाला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आषाढी एकादशी जवळ येत आहे. मानाच्या पालख्या पंढरपूरच्या दिशेला रवाना झाल्या आहेत. संत ज्ञानेश्वर माऊलींची पालखी पुण्याहून निघाली आहे. माऊलींची पालखी आज खंडेरायांच्या जेजुरीत दाखल झाली. यावेळी जेजुरीकरांनी मोठ्या उत्साहात माऊलींच्या पालखीचं स्वागत केलं.

**माऊलींची पालखी जेजुरीत दाखल**

संत ज्ञानेश्वर माऊलींची पालखी आज जेजुरी मुक्कामासाठी दाखल झाली. जेजुरी येथे आल्यावर संत ज्ञानेश्वर माऊलींच्या रथावर जेजुरीकरांनी भंडाऱ्याची उधळण केली.

जेजुरी येथील ग्रामस्थांनी या पालखी सोहळ्याचा मोठ्या उत्साहात स्वागत केले.

**लाखो वैष्णवजणांनी घेतलं महादेवाचं दर्शन**

जेजुरी येथे शैव आणि वैष्णवांची भेट होते. आज वारीसोळ्यात सहभागी असलेल्या लाखो वैष्णवजणांनी जेजुरीच्या खंडोबाचं म्हणजेच महादेवाचे दर्शन घेतलंय.

**शिवभभक्तांकडून मोठ्या उत्साहात स्वागत**

जेजुरी येथे असलेल्या शिवभक्तांनी माऊलींचे दर्शन घेतलंय. संत ज्ञानेश्वर माऊलींच शिवभभक्तांनी मोठ्या उत्साहात स्वागत केलंय.

**भंडाऱ्याने माऊलींचा रथ नाहून निघाला**

यावेळी पिवळ्या भंडाऱ्याने माऊलींचा रथ नाहून निघाला. 'येळकोट येळकोट, जय मल्हार' आणि 'माऊली माऊली' असा गजर करत खंडोबाच्या जेजुरी नगरीमध्ये संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचा मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले.





# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. या सोहळ्याला सुरवात झाली असून, मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होत आहे. मंदिर परिसर व दर्शनरांग गजबजली आहे. आषाढी सोहळ्याकरिता श्री संत ज्ञानेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज यांच्यासह असंख्य पालख्या व दिंडया श्रीक्षेत्र पंढरपूरच्या दिशेने मार्गक्रमण करत आहेत. या यात्रेच्या निमित्ताने श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिर, मंदिर परिसर, श्री.संत तुकाराम भवन व श्री.संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप या ठिकाणी रंगीबेरंगी व आकर्षक तसेच अत्याधुनिक पद्धतीची विद्युत रोषणाई करण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

श्री विठ्ठल रूक्मिणीमातेच्या गाभा-यावरील कळसास विशेष रोषणाई करण्यात आली असल्याने, भाविक कळस दर्शना बरोबर विद्युत रोषणाईचा आनंद घेत आहेत. रात्रीची ही दृष्य डोळ्यांची अक्षरशः पारणे फेडणारी आहेत. संपूर्ण परिसर प्रकाशमय झाला आहे. मंदिर समितीकडून यात्रेची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे.

सदरची विद्युत रोषणाई श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती व शिवदत्त डेकोरेटर्स पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने आठवड्याभराच्या अथक प्रयत्नांनंतर करण्यात आली असून, याची जबाबदारी विभाग प्रमुख शंकर मदने यांना देण्यात आली आहे. यासाठी एलईडी माळा, लटकन, तोरणे, रोप लाईट, आर्टीकल, व्हाईट व वॉर्म फोकस इत्यादी अत्याधुनिक साधनांचा वापर करण्यात आला आहे. तसेच सुरक्षतेच्या दृष्टीने देखील अत्याधुनिक मशिनरी बसविण्यात आलेल्या आहेत. यात्रेच्या निमित्ताने विठूरायाची नगरी लखलखली असून, दर्शनासाठी आलेल्या भाविकांना आत्मिक समाधान मिळत आहे, माय-बाप विठूरायाच्या भक्ताच्या स्वागताची मंदिर प्रशासनाची तयारी पूर्ण झाल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगितले.

# आषाढी यात्रा : कर्मचाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : आषाढ शुध्द एकादशीला म्हणजे दिनांक ०६ जुलै रोजी आषाढी यात्रा संपन्न होत आहे. या दिवशी मुख्यमंत्री महोदय व मानाचे वारकरी यांच्या शुभहस्ते सपत्नीक श्रींची शासकीय महापूजा आयोजित करण्यात आली आहे. या यात्रेला मोठ्या प्रमाणात वारकरी भाविकांची गर्दी असते. सदर यात्रा शांततेत व नियोजनबध्द पध्दतीने पार पाडणेकामी आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने मंदिर समितीच्या कर्मचाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

आषाढी यात्रा २०२५ निमित्त मोनिका सिंह-ठाकूर, अप्पर जिल्हाधिकारी तथा इन्सिडेंट कमांडर यांनी दिलेल्या सूचनेनुसार अग्निशमन, प्रथमोपचार, Causality Carrying Method व Safe Evacuation बाबत दि. २५ जुन रोजी श्री संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

प्रशिक्षण कार्यक्रमाचे दिपप्रज्वलन मंदिर समितीच्या सदस्या शकुंतलाताई नडगिरे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यामध्ये संभाजी कारले यांनी अग्निशमन तसेच बीमल नथवाणी, योगेश परदेशी व संतोष शेलार यांनी Causality Carrying Method Safe Evacuation बाबत प्रशिक्षण व प्रात्यक्षिते दिली. यावेळी मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, वसंत पिचारे अग्निशमन अधिकारी बार्शी तसेच सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.

सदरचे प्रशिक्षण हे यात्रा कालावधीच्या दृष्टीने खुप उपयोगी होणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमास मंदिर समितीकडील सुमारे २५० कर्मचारी / स्वयंसेवक उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मंदिर समितीच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतल्याचे यावेळी मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगीतले.

# शेतकऱ्यांनी रासायनिक खतांचा वापर बंद करावा : आमदार सचिन कल्याणशेट्टी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : शेतकऱ्यांनी रासायनिक खतांचा वापर बंद करावा या रासायनिक खताद्वारे आम्ही पुढील पिढीस विष देत आहोत. आजच्या पिढीमध्ये आजारांचे प्रमाण वाढले आहे याचे मूळ कारण रासायनिक खत आहे. उत्पन्न जास्त येण्यासाठी रासायनिक खतांचा भरमसाठ वापर सध्या शेतकरी करत आहेत. हजारो वर्षापासून आमचे आजोबा, पणजोबा, खापर पणजोबा यांनी शेती करत आलेत, पण आपण जितक रासायनिक खतांचा वापर करत आहोत तेवढं मागे कोणी केले नाही येणाऱ्या तुमच्या पिढीला तुम्ही शेतीमध्ये माती नाही तर दगड येईल. यामुळे शेतकऱ्यांनी सेंद्रिय खताकडे वळावा. शेणखतामुळे पीक येत नाही ही चुकीची भावना शेतकऱ्यांमध्ये आहे. सेंद्रिय खत व गोमूत्रामुळे उत्पन्नात दीडपट वाढ होते असे मत अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी पान मंगरुळ येथील सभेत बोलताना व्यक्त केले.



पानमंगरुळ येथील नूतन विद्यालयाच्या प्रांगणात अजित बाबू सुतार व स्त्री प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने सेवानिवृत्त सैनिक, प्रगतीशील शेतकरी व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित केला होता. श्री. म. नि. प्र. ब्र. शिवानंद शिवाचार्य महास्वामी विरक्त मठ करजगी, श्री. ष. शिवयोगी शिवाचार्य महास्वामी मंगरुळ यांच्या शुभहस्ते आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली डॉक्टर अशोक हिप्परगी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.


यावेळी उद्योजक अजित सुतार, स्त्री प्रतिष्ठानच्या अध्यक्षा रश्मी हिप्परगी, डॉक्टर सागर हिप्परगी, रामचंद्र अरवत, प्रकाश हिप्परगी, परमेश्वर यादवाड, सुरेश गड्डी, बाबु करपे, शिवशंकर जमादार, सतीश पवार मुख्याध्यापक पुजारी, लक्ष्मण पुजारी, चिदानंद कुंभार, संतोष पवार, शरणप्पा बनसोडे आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार कल्याणशेट्टी म्हणाले, सैनिकांमुळे आपण निवांत आहोत, सैनिकांचे कष्ट अपार आहेत देश सेवेसाठी ते आपले घर संसार सोडून देशाच्या रक्षणासाठी सीमेवर असतात. ऊन, वारा, पाऊस कुठलाही विचार न करता देशसेवा भावना मनात ठेवून काम करतात त्यामुळे आपण निवांत झोपत आहोत हे विसरून चालणार नाहीत.

यशस्वी विद्यार्थी पुढील शिक्षण घेताना वाईट मार्गावर जाऊ नयेत. चुकीच्या मार्गावर जाण्याच्या अगोदर आपल्या आई-वडिलांचा चेहरा डोळ्यासमोर आणा. खेडेगावातील विद्यार्थी पुढील शिक्षणासाठी मोठ्या शहरात गेल्यावर तिथल्या विद्यार्थ्यांशी तुलना करू नये विशेषतः मुलींनी काळजी घेणे गरजेचे आहे आपण पाऊल टाकताना विचार करणे गरजेचे आहे. आई -वडिलांचे गावाचं नाव चांगलं कसे येईल. याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. असे विद्यार्थ्यांना उद्देशून म्हणाले.

यावेळी श्री. म. नि. प्र. ब्र. शिवानंद शिवाचार्य महास्वामी विरक्त मठ करजगी, श्री. ष. शिवयोगी शिवाचार्य महास्वामी मंगरुळ यांचे आशीर्वचन झाले.

सुत्रसंचलन बाबूराव पवार यांनी केले, तर आभार राहुल हिप्परगी यांनी मानले.



## दुधनी ते नंदर्गी रस्ता काम निकृष्ट दर्जाची, ठेकेदार यांच्यावर कारवाई करा : इराणा दसाडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : दुधनी ते नंदर्गी रस्ता काम निकृष्ट दर्जाची, ठेकेदार यांच्यावर कारवाई करा असे मागणी दुधनी कृषी उपन्न बाजार समिती संचालक इराणा दसाडे यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांच्याकडे लेखी निवेदन देऊन केले आहे

दुधनी ते नंदर्गी रस्ता कामातील भष्टाचार चौकशी करून ठेकेदार यांना काळा यादीत टाकण्याबाबत अर्ज दिले आहे सदर दुधनी ते नंदर्गी रस्ता प्रजिमा क्र.५६ कि. मी. ०/०० ते १/४००, २/५०० ते ४/०० मध्ये सुधारणा करणे. असे काम मंजूर असून काम करण्यात आले काम निकृष्ट दर्जाची झाले आहे याबाबत त्यांनी वेळोवेळी ठेकेदार यांना कामात सुधारणा करण्यास सांगून ही सुधारणा केलेले नाही सदर काम करून दोन महिने झाले नाहीत रस्ता खराब झाले आहेत सदर कामाचे कार्यारंभ आदेश क्र. :- बी-१/एस.ई./ /२०२३-२४ अंदाजपत्रकिय किंमत :- २५०.०० लक्ष. लेखाशीर्ष :- ५०५४ (०४) मार्ग व पूल असे असून ठेकेदाराचे नाव :- मे. वर्षा कन्स्ट्रक्शन, सोलापूर. असे असून सदर कामाचे फोटो व व्हिडिओ कार्यकारी अभियंता यांना दाखवून त्याची योग्य चौकशी करून त्वरित कार्यवाही करण्यात यावे अन्यथा आम्हाला जन आंदोलन करावे लागेल असे लेखी निवेदनात दिले आहे.

**श्री पांडुरंगाच्या जयघोषात प्रवासास सुरुवात**

**सायकलस्वारांचा झाला सन्मान**

# निफाड सायकलिस्ट २५ सदस्यांची पंढरपूर सायकल वारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : पंढरपूर येथे पार पडलेल्या अखिल महाराष्ट्र पंढरपुर सायकल वारीमध्ये निफाड सायकलीस्टच्या २५ सदस्यांनी तीन दिवस नाशिक सायकलिस्ट फाउंडेशन सोबत सहभाग नोंदविला असून निफाड येथील श्री विठ्ठल मंदिरात सर्व सायकलिस्ट यांना मान्यवरांचे हस्ते वारीसाठी आवश्यक वस्तुंचे किट वाटप करण्यात आले. याप्रसंगी नगरसेवक संदीप (बंटी) शिंदे, नगरसेवक देवदत्त कापसे, नंदुभाऊ कापसे, निफाड वकील संघाचे अध्यक्ष प्रविण ठाकरे, सुभाष कुंदे, रवि शेठ ओस्तवाल, विजय सोनवणे, सौ सुशीला सोनवणे, सौ ठाकरे, सुरवाडे, श्री व सौ भाबड, जय योगेश्वर परिवार सदस्य यांनी निर्विघ्न, सुरक्षित आनंददायी सायकल वारीसाठी शुभेच्छा दिल्या.

शुक्रवारी पहाटे ५.०० वाजता सर्व सायकलिस्ट यांनी पांडुरंगाच्या जयघोषात प्रवासास सुरुवात केली. कोठुरे मार्गे म्हाळसाकोरे येथे संतोष वामन शिंदे यांचे कडून सर्व सायकलीस्ट यांना चहापान व्यवस्था करण्यात आली. सिन्नर येथे नासिक सायकलिस्ट फाउंडेशन सोबत पंढरपूर कडे नांदूर शिंगोटे, लोणी, कोल्हार, राहुरी(संत निवृत्तीनाथ पालखी दर्शन) मार्गे अहिल्यानगर येथे १६५ किमी सायकलिंग पुर्ण करण्यात येऊन मुक्काम करण्यात आला.

शनिवार पहाटे ५.०० वाजता अहिल्यानगर ते पंढरपूर सायकल प्रवास मिरजगाव, करमाळा, टेंभुर्णी, करकम मार्गे सुमारे २०० किमी अंतर पुर्ण करण्यात आले तर रविवारी सकाळी ६.०० वाजता पंढरपूर शहरात सर्व सायकलीस्ट यांनी नगर प्रदक्षिणा पूर्ण केली. केंद्रिय मंत्री रक्षा खडसे व अन्य मंत्री महोदय यांचे उपस्थितीत सायकल रिंगण सोहळा पार पडला त्यानंतर अखिल महाराष्ट्र पंढरपूर सायकल संमेलन २०२५ सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील, सायकलपटू अमित समर्थ, अध्यक्ष उमेश मालक परिचारक, राजेंद्र वानखेडे, नाईक , लातूर सायकलिस्टचे श्रावण उगले , बारामती सायकलिस्टचे वायकर, नाशिक सायकलिस्ट फाउंडेशन अध्यक्ष किशोर काळे यांचे उपस्थितीत पार पडले. राज्य भरातून आलेल्या सायकल क्लब अध्यक्ष व उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सायकलिस्ट यांचा या वेळी सन्मान करण्यात आला.



दैनिक
यश सिद्धि न्यूज



# आषाढी यात्रा सोहळा कालावधीत भाविकांना सेवा सुविधा पुरविण्यास सर्व यंत्रणांनी दक्ष रहावे : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

## आषाढी यात्रा पुर्वतयारी बाबत केबीपी कॉलेज पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी शुद्ध एकादशी सोहळा ०६ जुलै २०२५ रोजी होणार असून, या सोहळ्यासाठी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचे ३० जून तर जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याचे ०१ जुलै २०२५ रोजी सोलापूर जिल्ह्यात आगमन होणार आहे. तसेच अन्य पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या वारकरी भाविकांची पालखी मार्गावर, तळांवर तसेच रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये यासाठी सर्व यंत्रणांनी दक्ष राहावे. वारी कालावधीत प्रत्येक विभागाला देण्यात आलेली जबाबदारीने व समन्वयाने व्यवस्थित पार पाडावी, अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या.

आषाढी यात्रा पुर्वतयारी बाबत केबीपी कॉलेज पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम, अतिरिक्त जिल्हाधिकारी मोनिकासिंह ठाकूर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदिप कोहिनकर, प्रांताधिकारी अमित माळी, तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, तसेच पालखी सोहळ्यासाठी नियुक्त नोडल अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद म्हणाले, पालखी मार्गावर व तळांवर गेल्या वर्षी नियुक्त अधिकाऱ्यांना कोणत्या ठिकाणी अडचणी निर्माण झाल्या त्या अडचणी पुन्हा यावर्षी येणार नाहीत याची दक्षता घेऊन आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. भक्ती सागर ६५ एकर, वाखरी पालखी तळ या ठिकाणी पाणी वाटपाचे व्यवस्थित नियोजन करावे यासाठी चार ते पाच ठिकाणी निश्चित करून स्वयंसेवकाची नियुक्ती करावी. वाळवंटात हात गाडीवाले व मोकाट जनावरे येऊ नये यासाठी पोलीस प्रशासन व नगरपालिकेने योग्य ती दक्षता घ्यावी. वाखरी पालखीतळ भक्ती सागर (६५ एकर) येथे गॅस सिलेंडर वाटप करताना गॅस सिलेंडरची तपासणी करावी त्यासाठी आवश्यक पथकांची नियुक्ती करावी.

तसेच सुलभ शौचालय स्वच्छ करण्यासाठी सक्शेन व सेटिंग मशीन वाहनांना विशेष वाहन म्हणून घोषित करण्यात आले आहे. या वाहनांना जाण्यासाठी कॉरिडॉर तयार करण्यात येणार असून यासाठी संबंधित नियुक्त अधिकाऱ्यांनी पोलीस प्रशासनाच्या संपर्कात राहावे मानांच्या पालखी सोहळ्या समवेत नियुक्त करण्यात आलेल्या नोडल अधिकाऱ्यांनी पालखी सोहळा प्रमुखांच्या संपर्कात राहावे. जेणेकरून त्यांना आलेल्या अडचणी तात्काळ सोडवण्यात येतील हिरकणी कक्षात महिला कर्मचारी यांची नियुक्ती करावी. व ते कर्मचारी कक्षात उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिल्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम म्हणाले, वारकरी भाविकांच्या सुविधेसाठी चार्जिंग पॉइंट स्टेशन वेगवेगळ्या ठिकाणी लावावे जेणेकरून एकाच ठिकाणी गर्दी होणार नाही. सुलभ शौचालयाकडे जाणाऱ्या रस्त्यांवर चिखल होणार नाही याची दक्षता घ्यावी. पाण्याचे टँकर भरण्याच्या ठिकाणी अखंडित वीज पुरवठा ठेवावा पालखी सोहळे मुक्कामाच्या ठिकाणी येण्यापूर्वी स्वच्छ असावीत तसेच पालखी सोहळे गेल्यानंतर तात्काळ त्या ठिकाणची स्वच्छता करण्यात यावी अशा सूचना केल्या.

अतिरिक्त जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर म्हणाल्या, आषाढी यात्रा सोहळ्यासाठी पालखी मार्गावर तसेच पंढरपूर शहरात वारकरी भाविकांच्या सुविधेसाठी २७ आपत्कालीन केंद्र स्थापन करण्यात येणार आहेत. पालखी सोहळे संबंधित आपत्कालीन केंद्राच्या कार्यक्षेत्रातून बाहेर पडेपर्यंत दक्ष राहावे. कोणतीही धोकादायक परिस्थिती उद्भवल्यास त्याचे निराकरणासाठी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम कलम ३४ ज अन्वये आवश्यक तो निर्णय घेऊन कारवाई करावी. चंद्रभागा नदीपात्रात आवश्यक त्या उपकरणासह प्रशिक्षक पथक तैनात करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



यावेळी जिल्हा नगर प्रशासन अधिकारी वीणा पवार यांनी आषाढी यात्रा कालावधीत नगरपालिका प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या स्वच्छता, पाणीपुरवठा सुलभ सौचालय उपलब्धता निर्जंतुकीकरण आधी बाबतची माहिती दिली.

---

# कार्यसम्राट आमदार व शिवसेना विभागप्रमुख दिलीप मामा लांडे यांच्या नेतृत्वाखाली वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



घाटकोपर/केतन भोज : कार्यसम्राट आमदार व शिवसेना विभागप्रमुख दिलीप मामा लांडे यांच्या नेतृत्वाखाली तसेच घाटकोपर पश्चिम शिवसेना उपविभागप्रमुख हरेश (अण्णा) धांद्रूत यांच्या सहयोगाने घाटकोपर पश्चिम येथील प्रभाग क्रमांक १२६/१२७ या ठिकाणी शाळकरी विद्यार्थी यांच्या समवेत पर्यावरण जपण्याचा संदेश देत वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी उपविभागप्रमुख हरेश(अण्णा)धांद्रूत तसेच शाखा १२६ चे शाखप्रमुख मनीष कळबे, महिला शाखासंघटिका सौ.सुवर्णा वाळुंज, शाखा क्रमांक १२७ चे शाखप्रमुख विजय कोईलकर, महिला शाखासंघटिका श्रीमती.ज्योती ताई शेळके तसेच प्रभाग क्रमांक १२६/१२७ चे समन्वयक दत्ता शेट्ट केसरकर आणि शिवसेनेचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते या वृक्षारोपण कार्यक्रमावेळी उपस्थित होते.

---

# वारकऱ्यानी पोलीस ठाण्यामध्ये जाऊन पथकर सवलतीचे पास काढून घ्यावे : आ . मनोज कायंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी :

आषाढी वारी जाणाऱ्या भावीका साठी राज्य राज्य शासणाच्या वतीने पथकर सवलतीचे पास उपल्बध् करूण देण्यात येत आहे तरी भाविकानी या पासचा फायदा घ्यावा असे अव्हान आ. मनोज कायंदे यांनी केले.

प्रतिनिधी राजु भालेराव या वर्षी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांसाठी, राज्य शासनाच्या वतीने पथकर सवलतीचे पास उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

सिंदखेड राजा विधानसभा मतदार संघातील खालील पोलीस ठाण्यांमध्ये हे पास मिळतील: सिंदखेड राजा, किनगाव राजा, अंढेरा, साखरखेर्डा, बीबी, देऊळगाव राजा

पास वाटपाची तारीख: दि. १८ जून २०२५ ते दि. १० जुलै २०२५

सर्व भाविकांनी याची नोंद घ्यावी आणि वेळेत आवश्यक कागदपत्रांसह आपले पास प्राप्त करून घ्यावेत.

वारकऱ्यांना सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे आमदार मनोज भाऊ कायंदे यांनी आव्हान केले आहे.

---

# आषाढी पालखी सोहळ्यातील तीन दिड्यांना श्री. विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरीची पायीवारी ही महाराष्ट्राची प्राचीन, अध्यात्मिक व सांस्कृतिक परंपरा आहे. या पायीवारी सोहळ्याची परंपरा अखंड राहण्यासाठी या परंपरेचे रक्षण व संवर्धन करणे हे आपल्या सर्व वारकरी वैष्णवांचे सर्व प्रथम कर्तव्य आहे. हा पायीवारी सोहळा स्वच्छ, निरोगी व निरामय राखण्यासाठी या सोहळ्यातून समाजाला सामाजिक, पर्यावरण, वृक्ष संवर्धन, प्लॅस्टिक मुक्ती, व्यसनमुक्ती, स्त्रीभ्रूण हत्या यासारखे सामाजिक विषयांचे प्रबोधन होणे गरजेचे आहे.

आषाढी यात्रेतील सर्व सोहळ्यातील बऱ्याच दिंड्या हे कार्य करत आहेत, त्यांच्या कार्याचा उचित असा सन्मान व्हावा. त्याच प्रमाणे इतर दिंड्यानीही त्याचा आदर्श घेवून या निर्मल वारी, हरीत वारी अभियान मध्ये सहभाग घ्यावा. या जाणिवेतून, श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती मार्फत आषाढी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार सन २०१८ पासून सुरू करण्यात आला आहे.

**सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांची माहिती**

आषाढी पालखी सोहळ्यातील पहिल्या तीन क्रमांकाच्या दिंड्यांना आषाढी एकादशी दिवशी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते सन्मान चिन्ह व रक्कमेचा (प्रथम रू.१ लक्ष, द्वितीय रू.७५ हजार व तृतीय रू.५० हजार) धनादेश देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. त्यासाठी ड.माधवी निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, वृक्षमित्र ह.भ.प.शिवाजीराव मोरे या मंदिर समितीच्या तीन सदस्याची समिती गठीत करण्यात आली असल्याचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगीतले.

---

# अक्कलकोट तालुका पंचायत समिती सदस्यांसाठी मिस्पवर कार्यशाळा संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा संचलित स्प्रिंट फोर ह्युमॅनिटेरियन प्रकल्प यांच्या वतीने अक्कलकोट तालुका पंचायत समिती येथे मिनिमम इनिशियल सर्विस पॅकेज फॉर सेक्सुअल अँड रिप्रॉडक्टिव्ह हेल्थ फॉर मिस्प या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी अक्कलकोट तालुका पंचायत समितीचे माजी सभापती विलास गव्हाणे, सदस्य मल्लिनाथ करपे, पी. एल. कोळी, तालुका विस्तार अधिकारी महेश भोरे, ग्रामपंचायत सदस्य बसवराज अल्लोळी, संतोष राठोड, सरपंच बाबन चांद जमादार, टी.पी.ए. वैभव हिप्परगी, विनय विजापुरे, हेल्थ असिस्टंट लोकापुरे एस. एस., जयश्री निलंगे, वंदना कुळेवार, मौलाली बाशा वाडीकर, नजीर अहमद दलाल, हिशन मुजावर, मल्हार शेख, महेश बाबर, मेनसे एम. एन., प्रसार माध्यम तालुका प्रतिनिधी विश्वनाथ चव्हाण, राजू जगताप, नंदकुमार जगदाळे, सिद्धेश्वर पुजारी, फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे कर्मचारी कल्पना गडगडे, आकाश गायकवाड, करण खानापुरे आदींची प्रमुख उपस्थित होती.

यावेळी मार्गदर्शन करताना एफ. पी. ए. आय. सोलापूर शाखेचे शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड म्हणाले की, स्प्रिंट फोर ह्युमॅनिटेरियन प्रकल्प अंतर्गत आपत्ती व्यवस्थापनात सुरक्षित गर्भपात, कॅन्सर, लिंगभेद आधारित हिंसाचार समुपदेशन व पुनर्वसन, एच.आय.व्ही. सहजीवन जगणाऱ्या रुग्णांना आरोग्यसेवा, नको असलेली गर्भधारणा यावर उपचार, कुटुंब नियोजनाच्या साधनांचे सुनियोजित वाटप, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया, आदींसह इतर प्रजनन आरोग्य व कुटुंब कल्याणाच्या सेवां दिल्या जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. आपत्ती व्यवस्थापनात काम करण्यासाठी अक्कलकोट तालुका स्तरावर आरोग्य कर्मचारी, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, आरोग्य सेवक, स्थानिक पातळीवर विविध विषयावर काम करणाऱ्या सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, स्वयंसेवक व युवा स्वयंसेवकांच्या टीम करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक फॅमिली प्लॅनिंगचे कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी यांनी केले. स्वागत कल्पना गडगडे यांनी केले तर आभार आकाश गायकवाड यांनी मानले.

---



# समाजामध्ये डॉक्टरांना देव मानतात : आयकर आयुक्त डॉ. नितीन वाघमोडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वरकुटे मलवडी/प्रतिनिधी : वरकुटे मलवडी ता. माण येथे नव्याने डॉ प्रतीक शिंगाडे यांचे श्रीनाथ क्लिनिक या दवाखान्याचे उद्घाटन वरकुटे मलवडी चे सुपुत्र आणि आयकर आयुक्त डॉ नितीन वाघमोडे आणि पवार क्लिनिक चे प्रमुख डॉ विनायक पवार यांच्या शुभ हस्ते दि २२/०६/२०२५ रोजी सकाळी ९ वाजता करण्यात आले . यावेळी डॉ. नितीन वाघमोडे म्हणाले की शिंगाडे घराण्याची ही चौथी पिढी आहे की ती डॉ पेशात आहे आणि रुग्ण सेवा करत आहे.मी ही डॉ तायाप्पा शिंगाडे यांचा नातू आहे परंतु मला डॉ म्हणून प्रॅक्टिस करता आले नाही ते स्वप्न त्यांचां पणतू यांनी पूर्ण केले म्हणून डॉ प्रतीक शिंगाडे यांचे तोंडभरून कौतुक केले आणि शुभेच्या दिल्या.

रुग्ण सेवा म्हणजे ईश्वर सेवा,समाजसेवा म्हणून करा.

डॉ. विनायक म्हणाले की प्रतीक हा माझ्याकडे गेले दीड वर्ष प्रॅक्टिस करत आहे तो अत्यंत हुशार असून डॉ म्हणून परिपूर्ण आहे तो वैद्यकीय सेवा देण्यास सक्षम आहे याच्याकडे एकदा येऊन सेवेची संधी द्या वरकुटे पंचक्रोशी ने सहकार्य करावे असे आवाहन केले.

यावेळी उपाध्यक्ष अनिल देसाई, अध्यक्ष शिवाजीराव शिंदे,डॉ बाबासाहेब दोलताडे, डॉ कोडलकर , प्रा सचिन होनमाने सरपंच विक्रम शिंगाडे यांनी मनोगत व्यक्त केले यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष अनिल भाऊ देसाई,भाजपा तालुकाध्यक्ष शिवाजी शिंदे, इंदापूर तहसीलदार जीवन बनसोडे सरपंच विक्रम शिंगाडे विलास खरात इंदुबाई जेडगे मनिषा खिलारी आणि प्रमुख उपस्थिती म्हणून माण तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ लक्ष्मण कोडलकर, आटपाडी तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ साधना पवार डॉ नितीन बुरुंगले डॉ बाबासाहेब दोलताडे डॉ अभिजित खाडे डॉ पल्लवी मोरे डॉ रामदास आटपाडकर डॉ सागर गोरड इत्यादी डॉक्टर मंडळी उपस्थित होते यावेळी मां सभापती दादासाहेब शिंगाडे खादी ग्रामोद्योग सभापती सदाभाऊ बनगर मां सरपंच कुबेर आटपाडकर भारत अनुसे, प्रा. काशिनाथ आटपाडकर रतन वाघमोडे गणाबा खिलारी पी डी बनसोडे भागवत आनुसे अमोल जगताप राजू शिंगाडे राहुल खरात विलास शिंगाडे सदाशिव बनगर साहेब मां चेअरमन हणमंत आटपाडकर जयसिंग नरळे अजित बनगर भागवत अनुसे इत्यादी पंचक्रोशीतील नेते नागरिक उपस्थित होते. यावेळी उपसरपंच ज्ञानेश्वर (डी जी)बनगर सर यांनी आभार मानले.

---

**मंदीर समितीकडून वारकरी-भाविकांना देण्यात आलेल्या सुविधांची व श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदीराचे जतन संवर्धन आराखड्यातंर्गत सुरु असलेल्या कामांची माहिती दिली**

# वाखरी पालखी तळ, भक्ती सागर, वाळवंट, पत्रा शेडची विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांच्याकडून पाहणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी शुध्द एकादशी सोहळा दि. ०६ जुलै २०२५ रोजी असून, या आषाढी वारी सोहळ्यासाठी राज्यभरातून लाखो वारकरी भाविक येतात. या सोहळ्यासाठी येणाऱ्या प्रत्येक वारकरी भाविकाला आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात तसेच त्यांची कुठल्याही प्रकारची गैरसोय नये यासाठी प्रशासनाने व मंदीर समितीने केलेल्या सोयी-सुविधांची पाहणी विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केली .

पालखी तळ, भक्तीसागर(६५ एकर), चंद्रभागा वाळवंट येथे वारकरी भाविकांसाठी प्रशासनाकडून देण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये शौचालय, पाणी पुरवठा, आरोग्य सुविधा, सुरक्षा व्यवस्था तसेच मंदिर समितीकडून पत्रा शेड, दर्शन रांगेत, करण्यात आलेल्या सुविधांची पाहणी केली. तसेच नवीन बसस्थानकाजवळ पोलीस प्रशासनाच्या वतीने वारकरी भाविकांच्या सुरक्षेसाठी व गर्दी व्यवस्थापन आदीबातची माहितीसाठी एकात्मिक नियंत्रण प्रणाली च्या ठिकाणची विभागीय आयुक्त पुलकुंडवार यांनी पाहणी करुन आवश्यक सूचना दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी प्रशासनाकडून वारकरी भाविकांना देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांची माहिती दिली. तर मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी मंदीर समितीकडून वारकरी-भाविकांना देण्यात आलेल्या सुविधांची व श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदीराचे जतन संवर्धन आराखड्यातंर्गत सुरु असलेल्या कामांची माहिती दिली. तसेच मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी नगरपालिका प्रशासनाकडून ६५ एकर, वाळवंट व शहरात आरोग्याच्या दृष्टीने उपलब्ध सुविधा, अतिक्रमण मोहिम, शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रकाश व्यवस्था आदीबाबत माहिती दिली.



यावेळी त्यांच्यासमवेत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम, अतिरिक्त जिल्हाधिकारी मोनिकासिंह ठाकूर, प्रांताधिकारी सचिन इथापे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, मुख्याधिकारी महेश रोकडे, व्यवस्थापक मनोज श्रोत्री उपस्थित होते.